# बलुतेदारांमधील लोहार समाजाचे स्थान

# Status of Blacksmith Community in Barter System

**प्रा. रामनाथ पवार**
समाजशास्त्र विभाग
मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना:**

भारत देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशातील जवळपास 70% लोक ग्रामीण भागात राहतात आणि शेती व्यवसाय करतात. ग्रामीण भागातील लोकांचे जीवन शेती व शेतीशी संबंधित पूरक व्यवसायावर अवलंबून होते व आजही आहे. भारतीय समाजातील जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यामध्ये जातीचा पारंपरिक व्यवसायही तितकाच कारणीभूत असल्याचे लक्षात येते. ग्रामीण भागात जातीनुसार निश्चित झालेला व्यवसाय करण्याचे बंधन होते. विविध जातीगटांचा व्यवसाय परंपरागत निश्चित होता व हे सर्व जातीगटांचे लोक वर्षभर शेतकऱ्यांना मदत, सेवा देत असत. यातूनच निर्माण झालेली जी व्यवस्था आहे त्याला बलुतेदारी पद्धती असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. भारतीय समाजातील बलुतेदारी पद्धतीची माहिती घेणे.
2. बलुतेदार व शेतकऱ्याच्या परस्पर संबंधाचा आढावा घेणे.
3. बलुतेदारी पद्धतीतील लोहार जातीचे स्थान शोधणे.
4. लोहार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाची माहिती घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध-निबंध तयार करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके, दैनिक वृत्तपत्रे, शासकीय अहवाल व इतर प्रकाशित साहित्याचा उपयोग केला आहे.

**बलुतेदारीचा अर्थ :**

या पद्धतीत 12 बलुतेदार व 18 अलुतेदारांचा समावेश होतो. "बलुतेदारी प्रथेतील 'जजमान' हा शब्द यजमान' या संस्कृत शब्दाचे अपभ्रंश रूप आहे. या शब्दाची उत्पत्ती 'यज्ञ' संस्थेशी संबंधित असावी. यज्ञ करणाऱ्याला 'यजमान' म्हणत व तो करवून घेणाऱ्या ब्राह्मणाला 'पुरोहित' म्हणून संबोधतात. हाच 'यजमान' शब्द 'जजमान' म्हणून रूढ झाला. अर्थात, जी व्यती सेवा करून घेते ती जजमान मानली जाते व ज्या एक किंवा अनेक व्यक्ती ज्या जजमानाच्या सेवाकार्यात गुंतल्या जातात त्याला प्रजा, परजन किंवा कमीन असे म्हणतात."

डॉ. शर्मा बलुतेदारीची व्याख्या करताना म्हणतात की, "बलुतेदारीची व्यवस्था विभिन्न जातींतील सदस्यामध्ये असलेल्या ऊर्ध्वरेखीय संबंधाची द्योतक आहे. यात प्रत्येक जात ग्रामीण समुदायात राहणाऱ्या इतर जातीची नियोजित सेवा करते व त्याच्या बदल्यात रीतीनुसार ठराविक मोबदला घेते."

योगेंद्र सिंह बलुतेदारी पद्धतीसंदर्भात म्हणतात की, "जी गावामध्ये आंतरजातीय संबंधात आपापसात देवाण-घेवाणीच्या संबंधावर नियंत्रण ठेवून होती त्या जजमानी व्यवस्थेला दक्षिण भारतात 'आया' म्हणून ओळखले जाते."

**लोहार शब्दाचा अर्थ :**

लोहाराला इंग्रजीमध्ये 'Black Smith' या नावाने ओळखले जाते. 'लोहार' म्हणजे जो लोखंड किंवा पोलाद वापरून विविध वस्तू करतो. हातोडा, छिन्नी, भाता इत्यादी साहित्य वापरून शेतीची अवजारे, गृहोपयोगी भांडी, हत्यारे वगैरे तयार करतो. भारतीय समाजात लोहार ही प्रमुख व्यावसायिक जात म्हणून ओळखली जाते. जातीच्या आधारे लोहाराचा समावेश मागासवर्गीयांमध्ये होतो आणि वर्णव्यवस्थेनुसार शूद्र वर्णामध्ये केला जातो.

'लोहार' म्हणजे लोखंडापासून वस्तू तयार करणारा, तर 'लोहकार' म्हणजे मातीतून लोखंड तयार करणारा, प्राचीन काळी लोखंडाचा शोध लागला त्यावेळी जे लोक मातीतून लोखंडाचे कण वेगळे करून ते वितळवून त्याचे लोखंड तयार करत असत, त्यांना लोहकार या नावाने ओळखले जात असे. लोखंडाच्या खाणीत हेच लोक मोठ्या संख्येने काम करत असत. नंतरच्या काळात खाणींचे व्यवहार झाले. खाण मालक तयार झाले आणि खाणीत काम करणारे अखेर पर्यन्त मजूर म्हणूनच काम करत राहिले. पुढे ते लोहकार म्हणून ओळखले गेले. नंतरच्या काळात माणसांऐवजी यंत्राच्या साहाय्याने कारखान्यात मोठ्या प्रमाणात लोखंड तयार करू लागल्यामुळे लोहकार बेकार झाले. उपजीविकेसाठी लोखंडाच्या वस्तू बनवून उपजीविका करत राहिले. लोखंड करणारे (लोहकार) याऐवजी लोखंडाच्या वस्तू करणारे (लोहार) असे त्यांच्या कामाचे स्वरूप झाल्याने लोहार याच नावाने ते स्वत:ची ओळख करून देऊ लागले. आजही लोहार याच नावाने लोक त्यांना ग्रामीण व शहरी भागात ओळखतात.

'लोहार' ही जात हिंदू धर्मामध्ये समाविष्ट आहे. बारा बलुतेदारांमध्ये लोहार जातीला सुरुवातीपासूनच महत्त्वाचे स्थान राहिले आहे. लोखडांची कामे करण्याच्या व्यवसायावरून या समाजाला 'लोहार' संबोधले जाते. लोहारांचा उदय वेदकाळातच झाल्याचे स्पष्ट होते. अथर्ववेद, ऋग्वेद, यजुर्वेद व विश्वकर्मा पुराण यामध्ये लोहाराचा उल्लेख आढळतो.

ग्रामीण भागातील बलुतेदारी पद्धतीचा हेतू कौशल्ये व कुवत असलेल्या सर्व लोकांना अर्थव्यवस्थेत सामावून घेऊन त्यांच्या कुवतीप्रमाणे व वंशपरंपरेने उत्पन्न मिळवून देण्याची व स्वत:चे कौशल्ये कसब यांच्याकडे सातत्याने लक्ष देऊन आपली कला जोपासणे व ती पुढच्या पिढीकडे संक्रमित करणे हा आहे.

शेतकऱ्यांच्या उपयोगीतेनुसार बलुतेदारांचा महत्त्वक्रम निश्चित करण्यात आला असून, 12 बलुतेदारांचा प्रामुख्याने तीन ओळींमध्ये महत्त्वक्रमानुसार समावेश केलेला आहे.

**पहिली ओळ** : सुतार, लोहार, चांभार, महार.

**दुसरी ओळ** : कुंभार, मांग, परीट, -हावी.

**तिसरी ओळ** : जोशी किंवा भट, मुलाना, गुरव, कोळी.

वरीलप्रमाणे बलुतेदाराच्या कामाची निकड पाहता शेतकऱ्यांच्या जास्त उपयोगी पडणाऱ्याचा पहिल्या ओळीत, मध्यम उपयोगी पडणाऱ्याचा दुसऱ्या ओळीत, तर कमी उपयोगी पडणाऱ्या बलुतेदारांचा तिसऱ्या ओळीत समावेश करण्यात आलेला आहे. बलुतेदारांच्या महत्त्वक्रमाच्या या ओळीत 'लोहार' या बलुतेदाराचा पहिल्या ओळीत समावेश असल्याने वारंवार शेतकऱ्याना शेती उपयोगी वस्तू व सेवा देणाऱ्यामध्ये लोहाराचा समावेश होतो. ग्रामीण जीवनात 'लोहार' या बलुतेदाराला अनन्यसाधारण असे महत्त्व होते व आजही आहे.

याच काळातील बलुतेदारी पद्धतीमुळे व 12 बलुतेदारांमुळे खेड्यांना व्यावसायिक स्वायत्ततेबरोबर राजकीय स्वायत्तताही मिळाली होती, असे प्रतिपादन डॉ. एस.एस. सेन यांनी केले आहे. डॉ. अ.रा. कुलकर्णी यांनी बारा बलुतेदारांचे तीन प्रकारांत वर्गीकरण केले आहे. 1. खेडेगावातील कारागीर, 2. खेडेगावातील सेवकवर्ग, 3. धार्मिक विधी करणारा सेवकवर्ग.

यामध्ये लोहारांचा खेडेगावातील कारागीर या प्रकारात समावेश केला आहे, या काळात वस्तुविनिमय व रोख स्वरूपात व्यवहार चालत होते. त्यामुळे लोहारांनाकधी वस्तूच्या मोबदल्यात दुसरी वस्तू, तर कधी रोख स्वरूपात रक्कमही मिळत असे. चलनाचे साधन पैसा, नाणी झाले होते. मोबदला कोणत्याही स्वरूपात मिळत असला तरी गरज भागविणारा तो एक मुख्य व्यवसाय असल्याने लोहारांचे या काळात महत्त्व होते."

उत्तर भारतातील बलुतेदारी पद्धती आणि लोहारकामाबद्दल आपले मत मांडताना ऑस्कर लेवीस म्हणतात की, प्रत्येक लोहाराचे कुटुंब हे जजमानकडून निश्चित झालेले असते. हे लोहार गावातील लोकांसाठी कुऱ्हाड, वाकस, नांगर, लोखंडी गाडीचे चाक, धान्य पेरण्यासाठी तिफण, वखर इत्यादी अवजारे तयार करून देतात."

लोहार हा फक्त बलुतेदार नसतो, तर बलुतेदाराच्या कामाशिवाय लाकडी वखर तयार करून धाण्याच्या मोबदल्यात किंवा रोख स्वरूपात लाकडे विकणे हा त्याचा धंदा आहे. काही भागांत लोहार दसरा, दिवाळीच्या सणावेळी रंगीत चित्रेही विकतात. चावडीमध्ये व घरात ठेवण्यासाठी लोखंडी दिवा देतो, पोळ्याला बौलाच्या शिंगाला ठोकण्यासाठी शामी, अक्षयतृतीयेला गळ, साखळी व दसऱ्याला कुऱ्हाड देतो. या प्रथा अजूनही कमी-जास्त प्रमाणात आढळून येतात.

**लोहार तयार करत असलेली अवजारे :**

लोहार आपल्या भट्टीमध्ये विविध हत्यारांचा वापर करून खालील लोखंडाची शेती व गृहोपयोगी अवजारे तयार करतो.

1. **अडकित्ता** : सुपारी, आंबा, बौलांचा चारा फोडण्याचे व कापण्याचे हे हत्यार आहे. यात सुपारीसाठी लहान, आंब्यासाठी थोडा मोठा व चाऱ्यासाठी सर्वांत मोठा असे प्रकार असतात.

2. **आख** : बैलगाडीच्या दो-ही चाकांना जोडणारा मोठा लोखंडी लांब गज म्हणजे 'आख' होय. हा मध्यभागी चौकोनी असून तो लाकडात ('भिंड') बसविलेला असतो, तर दोन्ही टोकास गोल आकार देऊन त्यात चाक बसविलेले असतात. त्यास गाडीचा 'कणा' किंवा 'आख' म्हणतात.

3. **आरी** : मोटेच्या खालच्या लांबट चाकाच्या / कण्याच्या दोन्ही बाजूंची लोखंडी गजाची टोके त्या लाकडाच्या फळीवर बसवलेली असतात. या दोन्ही फळया विहिरीत आतील बाजूस पुढे झुकलेल्या असतात.

4. **इडया** : कोळपे, वखर, पाभर किंवा इतर शेती साधनांना लावण्याचे लोखंडी पत्र्यापासून बनवलेले वेटोळया आकाराचे साधन लाकडाच्या टोकाचा भाग झिजू नये व पास गळून पडू नये, ती पक्की राहावी म्हणून वखर, कोळपे यांच्या फणीला इडी लावली जाते. नांगराचा फाळ गळून पडू नये यासाठीही इडीचा उपयोग केला जातो.

5. **इळत** : नांगराचा फाळ, वखराची, कोळप्याची फास, तिफणीचे दुफणीचे फण इत्यादीवरील माती साफ करण्याचे एक साधन चाबकाच्या लाकडी मुठीवर किंवा औत हाकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दंडुक्याच्या एका टोकाला हे विशिष्ट आकाराचे लोखंडी पत्र्यांचे साधन बसविलेले असते. त्यास इळस, इळद या नावानेही ओळखले जाते.

6. **उकरी :** भुईमुगाच्या शेतीतील जमिनीत असलेल्या शेंगा उकरण्याचे साधन म्हणजे उकरी हे पत्र्यापासून बनवलेले असते. उकरीस हातात धरण्यासाठी मूठ असते. उकरीच्या साहाय्याने शेंगा काढल्या जातात.

7. **उलथणे :** भाकरी करताना भाकरी उलथण्यासाठी उपयोगात आणतात. ते लोखंडी किंवा स्टीलचे उलथणे लहान आकाराचे असते. लग्नकार्यात आचारी कढईतील भाजी, भात किंवा पाक हलवण्यासाठी मोठया उलथण्याचा उपयोग करतात. गुळाच्या गुऱ्हाळातही रस व पाक हलविण्यासाठी याचा उपयोग करतात.

8. **कडी :** लोखंडी गजापासून बनवलेले अर्धगोलाकार आकाराचे कडे बैलगाडीच्या मागच्या व पुढच्या बाजूला बसवलेले असते. गाडीवर माल बांधताना दोर ओढून घेण्यासाठी या कड्यांचा उपयोग होतो.

9. **कत्ता** : हे एक लोखंडी धातूपासून बनवलेले चपट्या आकाराचे साधन असते. पात्याच्या एका बाजूस धार असते. त्याचा उपयोग, लहान झुडपे तोडण्यासाठी व वेली, फोक साळण्यासाठीसुद्धा होतो.

10. **कत्ती :** शेतीच्या बांधावरील गवत काढण्यासाठी उपयोगी पडणारे एक लोखंडी साधन, याला हातात धरण्यासाठी लांब दांडा असतो, तर पाते अर्धगोलाकार चपटे व आतील बाजूने धारदार असते. याच्या विशिष्ट रचनेमुळे झाडाच्या फांद्या साळण्यासाठी उपयोगी पडते, नारळाची शेती करणाऱ्यांना याचा विशेष उपयोग होतो.

11. **कढई** : लोखंडी पत्र्यापासून बनवलेले एक मोठे साधन याचा उपयोग उसाच्या रसापासून गूळ तयार करण्यासाठी केला जातो.

12. **कप्पी :** पाणी ओढण्याचे लोखंडी चाक याला क-हा असेही म्हणतात.

13. **कानखीळ** : बौलगाडीचे चाक निघू नये म्हणून आखाच्या छिद्रात घातलेला लोखंडी गज किंवा पट्टी. ही पट्टी 4 ते 5 इंच लांब आणि वक्र स्वरूपाची असते. त्यामुळे गाडी चालताना चाक निघून पडत नाही.

14. **कुदळ** : जमीन खोदण्याचे लोखंडी हत्यार. हे हत्यार लोखंडापासून बनवलेले असते. ते चापट असते. ते ताव देऊन थोपटलेले असते. त्यामुळे जमीन खोदता येते.

15. **कुऱ्हाड** : झाडे, झुडपे, तोडण्याचे, लाकडे फोडण्याचे एक लोखंडी साधन, कुऱ्हाडीस एका बाजूने धारदार पाते असते व वरच्या बाजूला जाड भागाकडे वेटोळे छिद्र असून, त्यात लाकडी दांडा बसवलेला असतो.

16. **पहार** : पहार किंवा सबल नावाचे खोदण्याचे साधन असते हा चार-सहा फूट उंचीचा एका बाजूला चपटे टोक असलेला जाडसर लोखंडी गज असतो.

17. **कोयता** : लोखंडी पत्र्यापासून बनवलेले व ऊस तोडण्यासाठी उपयोगी पडणारे एक धारदार साधन असते. त्याच्या पाठीमागे लाकडी मूठ लावलेली असते.

18. **खुरपे** : गवत काढण्याचे, लाकडी मूठ असलेले लोखंडी साधन हे विळयाच्या आकाराचे पण विळयापेक्षा लहान असते. शिवाय विळयाइतके धारदार नसते. निंदण्या-खुरपण्याच्या कामासाठी हे साधन उपयोगी पडते, यास खुरपे असेही म्हणतात.

19. **खोरे** : माती, शेण, केरकचरा ओढण्याचे, खत भरण्याचे साधन, हे साधन लोखंडी पत्र्यापासून तयार केलेले असते. याच्या वरच्या भागास वाटोळया छिद्रात लाकडी दांडा बसविला जातो. याला फावडे, फावडं असेही म्हणतात.

20. **गूळमेख** : मोटेच्या खालच्या चाकाची कण्याची आरी. कण्याच्या दोन्ही बाजूंना लोखंडी जाड खिळे बसवलेले असतात. हे खिळे लोहाराने बनवलेले असतात.

21. **घुमकट** : बंद, बंदपट्टी, तोंडकडी, बौलगाडीच्या चाकाच्या तुंब्यावर धावेप्रमाणे असलेली वर्तुळाकार लोखंडी पट्टी. या पट्टीला गोलाकार आकार देण्याचे काम लोहार करत असतो.

22. **टिकाव** : जमीन खोदण्याचे एक लोखंडी अवजार या अवजाराच्या दोन्ही बाजूंना थोडा वाक असलेली लोखंडाची टोकदार पाती असतात. याच्या साहायाने शेतात चर खोदतात, खत मोकळे करण्यासाठी, आळे करण्यासाठीही उपयोग केला जातो. याला टिकास, तिकास असेही म्हणतात.

23. **दाबखीळ** : आखरी-पेटी व आख यांच्यात घातलेला लोखंडी गज, त्याला दाबखीळ असे म्हणतात.

24. **धावपट्टा** : बौलगाडीच्या चाकाला जमिनीशी चाक घासून ते झिजू नये म्हणून बसवलेले लोखंडी पट्टीदार आवरण. या आवरणाला गोल करण्याचे व जोड देण्याचे काम लोहार करत असतात, त्याचबरोबर या धावपट्ट्याला गरम करून चाकावर चढवण्याचे काम पण लोहार करतो.

25. **नाल** : लोखंडी पत्र्यापासून बनवलेले इंग्रजी 'यू' सारखे चपटे असणारे साधन बैलाच्या, घोड्याच्या खुरास मारावयाची अर्धचंद्राकार लोखंडी पट्टी. बैलाच्या खुरास नाल बसविल्याने एक तर बौलाचे खूर झिजत नाहीत. शिवाय डांबरी रस्त्यावर गाडी ओढताना बैलांचे पाय घसरत नाहीत.

26. **पास** : एक ते पाच वितीपर्यन्त लांबीची लोखंडाची अशी पट्टी, ज्यात पट्टीचा एक भाग थोडा धार दिलेला असतो, तर दो-हीकडच्या टोकांना जानोळयात बसविण्यासाठी टोक असते. पास (फास) वखरांना, कोळप्याना बसविली जाते व जमीन भुसभुशीत करणे, तण काढणे अशी शेतीची कामे केली जातात. जर पासेची धार बोथट झाली असेल, तर तिला शेवटण्याचे काम लोहार करत असतो.

27. **फाळ** : नांगराच्या जमिनीत घुसणाऱ्या टोकास लावावयाचे लोखंडी पाते, नांगराचा हा भाग जमिनीत घुसून जमिनीची नांगरणी करतो.

28. **फारुळा** : तिफणीला असणाऱ्या लाकडी टोकाला मातीत खोलवर रुजण्यासाठी लोखंडी फारुळे बसवावे लागतात. हे फारुळे बनवण्याचे काम लोहार करत असतात.

29. **फुंकणी** : जाळ फुंकण्याच्या लोखंडी नळीला फुंकणी किंवा फुकारी असेही म्हणतात. एखाद्या नळीपासून एक ते दीड फुटाची फुंकणी बनवली जाते.

30. **भोरकडी** : गाई-म्हशीचे वासरू बांधण्याच्या दोरीला अडकविण्याची एकात एक दोन कडया गुंतवून तयार केलेली कडी. वासरू गोल फिरले तरी दोरीचा फास त्याच्या गळयाला या कडीमुळे लागत नाही. ही लोखंडी सळई, कड्यापासून बनवलेली असते.

31. **वाकस** : लाकूड तासण्याचे लोखंडी साधन. याच्या धारदार पात्याकडील भाग बाकदार असतो. याचा वापर सुतार लाकूड तासण्यासाठी करतो. याला वेळोवेळी लोहाराकडून शेवटून घ्यावे लागते.

32. **विळा** : एका बाजूला धार असणारे लोखंडी पाते विळयाला असते. शेतकरी या साधनाचा वापर पीक कापण्यासाठी, गवत कापण्यासाठी करत असतात.

33. **सतूर** : जाडसर लोखंडी पात्याची एक बाजू धारदार करून मागील भागास मुठीसारखा गोलाकार दिला जातो. मांस तोडण्यासाठी खाटीक या चा उपयोग करतात.

34. **हूकपट्टी** : वजनदार, जाड दरवाजांना व त्यांच्या चौकटीस एकमेकांना जोडून ठेवणारे व दरवाजाची उघडझाप करण्ण्यास उपयोगात येणारे साधन म्हणजे हूकपट्टी होय."

वरील अवजारांशिवाय लोहार विविध प्रकारची व आकाराची अवजारे लोखंडापासून तयार करून ती शेतकऱ्याना पुरविण्याचे काम करतो तसेच सर्व प्रकारच्या अवजारांना बोथट झाल्याननंतर शेवटून धार व पाणी पाजण्याचे कामही करतो.

**समारोप :**

एकंदरीत लोहार समाजाचे ग्रामीण भागातील बलुतेदारी पद्धतीत महत्वाचे स्थान राहिले आहे. लोहार बलुतेदाराशिवाय शेतकऱ्याला शेतीचे काम करता येत नसल्याचे निदर्शनास येते. लोहाराने बनवलेल्या हत्यारे – अवजाराच्या साहाय्याने शेतकरी शेतीमध्ये मशागत करू शकत होता. शेतकऱ्यांना शेती करण्यामध्ये लोहार बलुतेदाराची महत्वाची भूमिका राहिली आहे, परंतु औद्योगीकरणानंतर बलुतेदारी पद्धतीचा ऱ्हास होत असल्याचे निदर्शनास येत आहे. पारंपरिक व्यावसायिकांची जागा आता कारखानदारीने घेतली आहे, त्यामुळे सर्वच बलुतेदारांचे व्यवसाय मोडकळीस आले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1. आत्रे त्रींबक नारायण, गावगाडा, वरदा बुक्स, पुणे, 1995.
2. आहुजा राम, भारतीय समाज, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, 2000.
3. बोबडे प्रकाश, भारतीय समाजरचना पारंपरिक व आधुनिक, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 1983.
4. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, 1976.
5. प्रा. चव्हाण रामनाथ, भटक्या-विमुक्तांची जातपंचायत खंड-5, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि., पुणे, 2013.
6. घाटोळे रा.ना., ग्रामीण समाजशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 1994.
7. डॉ. लुलेकर प्रल्हाद जी., बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2015.
8. https://hi.wikipedia.org/wiki/lohar
9. Lewis Oscar, Village life in Northern India, University of Illinois Press, Champaign, Chicago. 1958.